# प्रेस नोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/९४९३/२०२० पिंपरी चिंचवड शहर दिनांक-२४/०४/२०२०

पिंपरी डेअरी फॉर्म रेल्वे गेट व नवमहाराष्ट्र शाळा, पिंपरी गाव रेल्वे फाटकाचे काम करावयाचे आहे. या ठिकाणी रेल्वेचे फाटक मध्ये खडी, स्लिपरस, रेल्वे रूळ इ. दुरूस्तीचे काम करणार आहेत. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०११६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून सुधिर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पिंपरी चिंचवड शहर पिंपरी डेअरी फार्म रोड रेल्वे गेट दि.२५/०४/२०२० ते २६/०४/२०२० दरम्यान खालीलप्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

- पिंपरी डेअरी फार्म रोडने रेल्वे गेट फाटक कडे न जाता सरळ पुणे-मुंबई रोडने आंबेडकर चौक, पिंपरी मार्गे इच्छित स्थळी जातील.
- नवमहाराष्ट्र विद्यालय पिंपरी रोडने डेअरी फार्मकडे जाणारी वाहतूक नवमहाराष्ट्र विद्यालय येथून डावीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

तरी वरील वाहतूक बदलाबाबत सेंट्रल रेल्वेचे कर्मचारी व वाहतूक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतूक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से

पोलीस उप-आयुक्त,वाहतूक

पिंपरी चिंचवड शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,

नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२) सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक पिंपरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टसह दोन दिवसात सादर करावी.

४) सिनियर सेक्शन इंजिनियर, मेन लाईन,सेंट्रल रेल्वे

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.